सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११

# महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९

(दिनांक १६ जून २०१५ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XI of 2001**

# The Maharashtra Project Affected Persons Rehabilitation Act, 1999

*(As modified upto 16 June 2015)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१५

[ किंमत : रुपये ७. ०० ]

(२००१ चा महा. ११)

# महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९

## अनुक्रमणिका

उद्देशिका. पृष्ठे

कलमे.

प्रकरण एक

प्रारंभिक

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | २ |

प्रकरण दोन

मुख्य नियंत्रणाधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | पुनर्वसनाच्या बाबी संबंधातील मुख्य नियंत्रणाधिकार. | .. | ५ |
| ४. | मुख्य नियंत्रणाधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे. | .. | ५ |
| ५. | जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे. | .. | ५ |
| ६. | प्रकल्प प्राधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे. | .. | ६ |
| ७. | अधिकार दुय्यम अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करणे. | .. | ७ |
| ८. | अधिकारी व कर्मचारी यांची अधीनता. | .. | ७ |
| ९. | सल्लागार समिती स्थापन करणे. | .. | ७ |

प्रकरण तीन

बाधित व्यक्तींचे पुनर्वसन

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | बाधित व्यक्तींचे पुनर्वसन. | .. | ७ |
| ११. | बाधित आणि लाभधारक परिमंडळामधील अधिसूचित करावयाची क्षेत्रे. | .. | ९ |
| १२. | जमिनीचे हस्तांतरण, पोट विभागणी, विभाजन, रूपांतरण किंवा सुधारणा यांवरील निर्बंध. | .. | १० |
| १३. | बाधित आणि लाभधारक क्षेत्रे घोषित करणे. | .. | ११ |
| १४. | या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जमीन खरेदी करण्याचा किंवा जमीन संपादन करण्याचा अधिकार. | .. | १२ |
| १५. | पुनर्वसनाचे प्रस्ताव तयार करणे व ते प्रसिध्द करणे. | .. | १२ |
| १६. | जमीन देणे व जमिनीचे अभिहस्तांकन आणि विशेष अनुदान देणे. | .. | १२ |
| १७. | प्रकल्पबाधित व्यक्तीला विकसित जमीन मंजूर करण्याचा अधिकार. | .. | १४ |

अनुक्रमणिका—चालू


| | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १८. | मांडणीचे कार्यान्वयन प्रकल्प अधिकाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाने करणे आणि ते पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेकडे ते निहित होणे. | . . | १४ |
| १९. | भाराचे हस्तांतरण. | . . | १४ |
| २०. | प्रकल्प पूर्ण झाल्यावर ज्यावर बांधकाम करण्यात आले आहे अशा जमिनी, त्यावरील बांधकामासहित निकालात काढणे. | . . | १५ |

## प्रकरण चार

## संकीर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | शास्ती. | . . | १५ |
| २२. | शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी आयुक्त इत्यादींना सहाय्य करणे. | . . | १५ |
| २३. | या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे. | . . | १६ |
| २४. | अधिकारितेस प्रतिबंध. | . . | १६ |
| २५. | या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईस संरक्षण. | . . | १६ |
| २६. | नियम करण्याचे अधिकार. | . . | १६ |
| २७. | राज्याच्या धोरणासंबंधात घोषणापत्र. | . . | १६ |

## प्रकरण पाच

## निरसन व व्यावृत्ती

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | निरसन व व्यावृत्ती. | . . | १६ |
| २९. | अडचण दूर करणे. | . . | १७ |
| अनुसूची | | . . | १७ |

## सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११[१]

# ["महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९"]

(१४ मार्च २००१)

(या अधिनियमास, दिनांक ७ मार्च, २००१ रोजी मा.राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** सर्वसाधारण भाग आठ यामध्ये दिनांक १४ मार्च २००१ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :-

सन २००९ # चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, (२८-१०-२००९) †

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, (६/५/२०१३) †

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित प्रकल्पांमुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करणे याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विवक्षित प्रकल्पांमुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ असे म्हणावे; संक्षिप्त नाव व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील*** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल.

(४) (अ) ज्या पाटबंधारे प्रकल्पाचे बाधित परिमंडल क्षेत्र ५० हेक्टरांहून अधिक असेल किंवा लाभधारक परिमंडल क्षेत्र २०० हेक्टरांहून अधिक असेल, किंवा गावठाण बाधित होत असेल, अशा सर्व पाटबंधारे प्रकल्पांना तो लागू होईल.

(ब) तो, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पाटबंधारे प्रकल्पांव्यतिरिक्त औद्योगिक वसाहतीसहीत उद्योग, अणुउर्जा, विद्यापीठ, तेल आणि नैसर्गिक वायू, ऊर्जा रसायन, रस्ते, राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य, खाणी, इत्यादींसारख्या सर्व प्रकल्पांनाही लागू होईल. तथापि, संबंधित प्रकल्प, प्राधिकरण किंवा निकाय यांच्याशी करार करून तो प्रकल्प पार पाडणे आणि प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन करणे याची सपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागावर असेल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी दिनांक १९ एप्रिल, १९९९ चे **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग पाच अ, सर्वसाधारण, पृ.३०७-३०८ पहा.

* हा अधिनियम दिनांक १ एप्रिल, २००२ पासून अंमलात आला. पहा शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक - एलएए ५९९/सीआर-१४८/भाग दोन/आर-१, दिनांक १४ मार्च २००२.

# सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ द्वारे सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ निरसित करण्यात आला.

† ही खुण अधिनिमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

(क) राज्य शासनाच्या मते, लोकहिताच्या दृष्टीने तो, इतर कोणत्याही प्रकल्पाला लागू करणे जेथे आवश्यक व इष्ट असेल तेथे राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे जाहीर करू शकेल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रकल्पाच्या संबंधात तो लागू होईल आणि त्यानंतर या अधिनियमाच्या तरतुदी अशा प्रकल्पाला लागू होतील.

(ड) खंड (अ) व (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, आंतरराज्यीय प्रकल्पांच्या अधिकारितेत येणाऱ्या प्रकल्पांना तो लागू होणार नाही. बाहय अभिकरणांमार्फत आणि देशांमार्फत अर्थसहाय्यित पुनर्वसन कामांना हा अधिनियम लागू होणार नाही.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(१) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात "बाधित परिमंडल" म्हणजे, त्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या परिमंडलाचे क्षेत्र म्हणून कलम १३ अन्वये घोषित केलेले क्षेत्र ;

(२) "प्रकल्पबाधित व्यक्ती" म्हणजे.-

(अ) एखाद्या प्रकल्पाच्या प्रयोजनांकरिता, कलम १४ अन्वये ज्या भोगवटादाराची प्रकल्पबाधित परिमंडलातील जमीन (गावठाणातील जमीन धरून) संपादित करण्यात आली असेल, अशी भोगवटादार व्यक्ती ;

**स्पष्टीकरण.** – या उपखंडाच्या प्रयोजनार्थ, जेथे एखाद्या शेतजमिनीची, संबंधित गावाच्या अभिलेखातील नोंद, अविभक्त हिंदू कुटुंबातील कर्ता पुरूष किंवा व्यवस्थापक म्हणून कोणत्याही एका भावाच्या नावे केलेली असेल, तेथे, प्रत्येक भावाला [1][किंवा बहिणीला] (किंवा [2][प्रत्येक मृत भावाचा किंवा मृत बहिणीचा मुलगा किंवा मुलगे किंवा मुलगी किंवा मुली यांना अशा भावाचे किंवा बहिणीचे प्रत्येकी एक स्वतंत्र युनिट] म्हणून) त्या जमिनीत हिस्सा राहील, मग त्याचे नाव अशा गावाच्या अभिलेखात नोंदलेले असो वा नसो, आणि त्यास प्रकल्पबाधित व्यक्ती म्हणून मानण्यात येईल ;

(ब) जमिनीच्या संपादनाच्या वेळी जिच्याकडे संबंधित कुळवहिवाट कायद्यान्वये बाधित परिमंडलातील जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असेल अशी व्यक्ती ;

(क) लाभधारक परिमंडलातील ज्या भोगवटादार व्यक्तीची जमीन, पाटबंधारे प्रकल्पांखालील कालवे व त्यांचे किनारे यांचे बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकास यांसाठी किंवा बाधित परिमंडलातील व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी लाभधारक परिमंडल क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्राबाहेर नवीन गावठाण वसविण्यासाठी संपादित केली असून, –

(एक) संपादनानंतर जिची उर्वरित लागवडयोग्य धारण जमीन १ हेक्टरहून कमी झाली आहे ; किंवा

(दोन) जिची उर्वरित धारण जमीन अशा तुकडयांमध्ये विभागली गेली आहे की, ते लागवडीच्या दृष्टीने फायदेशीर राहिलेले नाहीत ; किंवा

(तीन) जिची उर्वरित धारण जमीन लागवडीस अयोग्य ठरली आहे, अशी भोगवटादार व्यक्ती.

---

१. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१०, कलम २ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (दोन) अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.** – या उपखंडाच्या प्रयोजनार्थ "भोगवटादार" या शब्दप्रयोगात, जमीन संपादन केली जात असताना संबंधित कुळवहिवाट कायद्यान्वये लाभ प्राप्त परिमंडलात जमीन प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या कुळाचा समावेश होतो.

(ड) शेतमजूर असलेली व्यक्ती ;

(ई) भोगवटादार नसलेली किंवा उपखंड (अ), (ब), (क) आणि (ड) मध्ये उल्लेख करण्यात न आलेली जी व्यक्ती भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ खालील अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपूर्वीच्या लगत ५ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या अखंड कालावधीसाठी, बाधित परिमंडलातील गावठाणात सर्वसाधारणतः राहात असेल किंवा कोणताही व्यापार, व्यवसाय किंवा आजीविका किंवा मोबदल्यादाखल काम करीत असेल, अशी व्यक्ती ; १८९४ चा १.

(३) "शेतमजूर" म्हणजे बाधित परिमंडलात कोणतीही जमीन धारण न करणारी, परंतु ती जमीन ज्यात आहे असे क्षेत्र कलम १३ अन्वये बाधित परिमंडल म्हणून घोषित केले जाण्याच्या लगतपूर्वी पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी वर्षे त्या शेतजमिनीवर मुख्यतः शारीरिक कष्ट करून आपला चरितार्थ चालविणारी आणि मुख्यतः त्या जमिनीवर शारीरिक कष्ट करून त्याद्वारे आपला चरितार्थ चालवण्यापासून जिला मुकावे लागले आहे अशी व्यक्ती ;

**स्पष्टीकरण.** – बाधित परिमंडलातील पाच वर्षाचा निवास निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी लागणारी, मानके विहित केल्यानुसार असतील.

(४) "शेतजमीन" या संज्ञेत फळबागायत करणे, पिके, गवत किंवा बागायती उत्पन्न काढणे, दुग्धव्यवसाय, पशुधन पैदास, कुक्कुटपालन, मत्स्यसंवर्धन शेती, मत्स्य बीज उत्पादन केंद्र, रोपमळे, औषधी वनस्पतींची लागवड किंवा गुरांची चराई, यासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याजोग्या जमिनी यांचा समावेश होतो, परंतु केवळ लाकूड तोडणे यासाठी वापरलेल्या जमिनीचा त्यात समावेश होत नाही;

(५) कोणत्याही प्रकल्पाच्या संबंधात "लाभधारी" म्हणजे, त्या प्रकल्पापासून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यक्तिशः किंवा समाज म्हणून किंवा संस्था, कंपनी अथवा, कारखाना म्हणून ज्याला लाभ मिळतो असे कोणीही ;

(६) कोणत्याही प्रकल्पाच्या संबंधात "लाभधारक परिमंडल" म्हणजे त्या प्रकल्पामुळे लाभ झालेल्या परिमंडलाचे क्षेत्र म्हणून कलम १३ अन्वये घोषित करण्यात आलेले क्षेत्र ;

१९६६ चा महा. ४१. (७) "संहिता" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ;

(८) "धारणजमीन" म्हणजे, भोगवटादार किंवा कूळ म्हणून किंवा त्या दोन्ही नात्यांनी एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ;

**स्पष्टीकरण.** – या खंडाच्या प्रयोजनासाठी, एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन मोजताना लाभधारक परिमंडल क्षेत्रातील पुढील जमिनी विचारात घेतल्या जाणार नाहीत :-

(अ) ज्या जमिनीवर राहते घर किंवा पशुशाला (गोठा) उभारलेला आहे अशी जमीन आणि अशा जमिनीत अशा राहत्या घराच्या किंवा पशुशालेच्या (गोठयाच्या) भोवतालची तीन मीटर जमीन समाविष्ट असणाऱ्या लगतच्या क्षेत्राचाही समावेश होईल ;

(ब) ज्या जमिनीवर विहिर खणलेली आहे आणि विहिर म्हणून ती भूमि अभिलेखाच्या गाव नोंदवहीमध्ये (गावचा नमुना सात-बारा) दाखवली आहे अशी जमीन ;

(क) कलम ११ अन्वये अधिसूचना जारी केल्याच्या वर्षाच्या लगतपूर्वी जी जमीन सतत किमान पाच वर्षाच्या किंवा अधिक कालावधीकरिता भूमि अभिलेखांच्या गाव नोंदवहीमध्ये (गावचा नमुना सात-बारा) कृषियोग्य नसलेली किंवा लागवडयोग्य नसलेली (पोट खराब) म्हणून दाखवली आहे अशी जमीन ;

(ड) कलम ११ अन्वये अधिसूचना जारी केल्याच्या वर्षाच्या लगतपूर्वी सतत किमान पाच वर्षाच्या कालावधीकरिता, भूमि अभिलेखांच्या गाव नोंदवहीमध्ये (गावचा नमुना सात-बारा) खार जमीन म्हणून दाखवलेल्या जमिनीच्या पन्नास टक्के.

(९) "भूसंचय" म्हणजे बाधित व्यक्तीच्या पुनर्वसनाकरिता उपलब्ध असतील अशा, कलम १४ ची पोट-कलमे (१) व (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी ;

(१०) "प्रकल्प" म्हणजे, –

(अ) पाटबंधारे प्रकल्प व त्याचा अर्थ पाटबंधाऱ्यांच्या प्रयोजनार्थ, पाणीपुरवठा करण्यासाठी केलेले कोणतेही बांधकाम, बांधकामाचा विस्तार, सुधारणा किंवा विकास ;

(ब) अणु व वीज प्रकल्प म्हणजे, वीजनिर्मिती किंवा वीजपुरवठा यासंबंधाचे कोणतेही बांधकाम, बांधकामाचा विस्तार, सुधारणा किंवा विकास अथवा वीजविषयक विकासाला पोषक असे कोणतेही काम ;

(क) लोकोपयोगी प्रकल्प रस्त्यासहित म्हणजे पाटबंधारे प्रकल्प किंवा वीज प्रकल्प यांच्याव्यतिरिक्त लोकोपयोगासाठी केलेले कोणतेही बांधकाम, बांधकाम विस्तार, सुधारणा किंवा विकास ;

(ड) वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ याच्या तरतुदींअन्वये घोषित केलेले राष्ट्रीय उद्यान व अभयारण्य ; १९७२ चा ५८.

(ई) औद्योगिक प्रकल्प, म्हणजेच, उत्पादन, वितरण किंवा सेवा उद्योग स्थापन करणे किंवा त्याच्याशी संबंधित कोणतीही सेवा पुरवणे आणि त्यात, औद्योगिक वसाहतीचा समावेश होतो ;

(फ) विद्यापीठ प्रकल्प, म्हणजेच, कोणत्याही विद्यापीठाची किंवा कोणत्याही शैक्षणिक, प्रशिक्षण संस्थेची स्थापना करणे ;

(ग) रासायनिक प्रकल्प, म्हणजेच, रसायने काढणे, त्यांचे उत्पादन आणि प्रक्रिया ;

(ह) खाण प्रकल्प, म्हणजेच, पृथ्वीच्या भागामधून किंवा नदीच्या पात्रातून कोणत्याही खनिजाचे उत्खनन;

(आय) अशा दोन किंवा अधिक प्रकल्पांचा कोणताही संयुक्त प्रकल्प ;

आणि त्यामध्ये ज्यामुळे, अशा प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीचे धारक किंवा भोगवटादार बाधित होतात आणि ज्यांच्या संबंधात कलम ११ अन्वये अधिसूचना काढण्यात आली आहे, असे एखाद्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची आनुषंगिक किंवा त्यास पूरक असणारे पंप हाऊसचे बांधकाम, उध्दरण सिंचन योजना, वसाहत असे कोणतेही बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकासविषयक कामे यांचा समावेश होतो ;

(११) ''प्रकल्प प्राधिकारी'' म्हणजे ज्याच्याकडे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या कामाचे सर्वसाधारण नियंत्रण व देखरेख करण्याचे काम निहित केलेले आहे असा अधिकारी, आणि त्यामध्ये, राज्य शासन, ज्यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्रकल्प प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित करील अशा अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(१२) ''विहित'' म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित;

(१३) ''महसूल विभाग'' म्हणजे, संहितेच्या कलम ३ अन्वये जो महसुली विभाग होईल असे महसुली क्षेत्र;

(१४) ''नियम'' म्हणजे, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेले नियम;

(१५) ''अनुसूची'' म्हणजे, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची;

(१६) ''लागवड करणे'' म्हणजे, कोणतेही शेतीविषयक काम करणे व ''लागवड '' या शब्दप्रयोगाचा अर्थ तद्नुसार लावण्यात येईल;

(१७) ''ग्रामपंचायत'' म्हणजे, या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात ''महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम '' * सन २०१२ चा महाराष्ट्र २४ द्वारे सुधारणा करण्यात आली अशी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये स्थापन करण्यात आलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात आलेली ग्रामपंचायत; १९५९ चा मुंबई ३.

(१८) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संहितेमध्ये आणि संबंधित अधिनियमांमध्ये जे अर्थ नेमून दिले असतील, तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## मुख्य नियंत्रणाधिकारी, प्रकल्प प्राधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये

पुनर्वसनाच्या बाबी संबधातील मुख्य नियंत्रणाधिकार.

३. महसुली विभागातील बाधीत व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधीत सर्व बाबीमध्ये मुख्य नियंत्रणाधिकार, राज्य शासनाचे अधिक्षण, निदेशन व नियंत्रण यांच्या अधीनतेने संहितेच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या आयुक्ताकडे निहित राहील.

मुख्य नियंत्रणाधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे.

४. राज्य शासनाच्या कोण्यात्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून आयुक्ताची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील;

(अ) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या संबंधात राज्य शासनाने आखलेल्या धोरणाच्या चौकटीत पुनर्वसन कार्यक्रमाची अंमलबाजावणी करणे;

(ब) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधीच्या कामात समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे;

(क) संबधित जिल्हाधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी यांना प्रकल्पाच्या कामाबरोबरच पुनर्वसनाचे काम हाती घेण्यास सांगून व बाधित व्यक्तींच्या पुनर्वनाच्या संबंधात झालेल्या प्रगतीची माहीती ठराविक कालांतराने त्यांच्याकडून मागवून आणि त्या त्या प्रकरणाच्या परिस्थितीत जरूर असेल तसे मार्गदर्शन व सहाय्य त्यांना देऊन बाधित व्यक्तींचे शीघ्र पुनर्वसन होण्याची खात्री लायक व्यवस्था करणे;

(ड) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या संबंधात राज्य शासनाला नियतकालीक अहवाल सादर करणे;

---

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, नोंद क्र. ७४, द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात ''महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम'' अशी सुधारणा करण्यात आली.

(ई) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन पार पाडण्याकरिता निधीची तरतुद करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे;

(फ) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता आपल्या अखत्यारीत यथोचितरीत्या मिळालेले अनुदान बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरीता अधिकाऱ्याना व प्राधिकाऱ्यांना आपणास योग्य वाटेल अशा त्यांच्या गरजानुसार व योग्य वाटेल अशा कालांतराने संवितरीत करणे;

(ग) आपल्या अखत्यारात मिळालेल्या अनुदानाचा योग्य वापर होत असल्याबद्दल खात्री करून घेणे आणि चाचणीवजा लेखापरीक्षा पार पाडणे;

(ह) राज्य शासन वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे आपणावर सोपवील अशी इतर कामे पार पाडणे.

जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे.

५. जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील.–

(अ) जिल्हाधिकाऱ्याच्या जिल्ह्यातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबधीच्या कामात समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे;

(ब) प्रकल्प बाधित व्यक्तिंच्या पुनर्वसनासंबधात राज्य शासनाने आखलेल्या धोरणाच्या चौकटीनुसार प्रकल्पबाधित व्यक्तींचे शीघ्र पुनर्वसन होते आहे यांची सुनिश्चिती करण्यासाठी प्रकल्पाधिकारी व प्रकल्पाच्या कामावर नियुक्त केलेले दुय्यम अधिकारी यांना वेळोवेळी त्यांना नेमून देण्यात येईल असे पुनर्वसनाचे काम करण्यास भाग पाडणे;

(क) प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या नामनिर्देशित व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या कोट्यामध्ये नोकरी मिळण्यासाठी प्रकल्पबाधीत व्यक्तीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला प्रमाणपत्र देणे;

(ड) राज्य शासन किंवा आयुक्त, वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे त्याच्याकडे सोपवील अशी इतर कामे करणे.

प्रकल्प प्राधिकाऱ्याची कर्तव्ये व कामे.

६. प्रकल्प प्राधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील.–

(अ) राज्य शासनाने किंवा आयुक्ताने किंवा जिल्हाधिकाऱ्याने, प्रकल्प प्राधिकाऱ्याकडे सोपविले असेल त्याप्रमाणे बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता प्रस्थापीत केलेल्या नवीन गावठाणात किंवा यथास्थिती विद्यमान गावठण्याच्या विस्तारीत भागात आवश्यक नागरी सुविधा पुरविण्याचे काम करणे;

(ब) जिल्हाधिकाऱ्याच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व मार्गदर्शनाखली बाधित व्यक्तींच्या त्वरित पुनर्वसनाकरीता उपाययोजना करणे;

(क) वैध रीतीने करण्यात आलेल्या कोणत्याही राखीव जागांच्या तरतुदींस आणि पदांच्या उपलब्धतेस अधीन राहुन प्रकल्पबाधीत व्यक्तीने कुटुंबातील नामनिर्देशित केलेल्या एका व्यक्तीस, जर अशी व्यक्ती प्रकल्प आस्थापनेवरील सेवेच्या वर्ग तीन आणि वर्ग चार प्रवर्गातील पदांसाठी असलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार अशा पदांसाठी पात्र असेल तर, रोजगार मिळण्याबाबत सर्वोच्च प्राधान्य देणेः

परंतु असे की, बाधित व्यक्तींमधील नामनिर्देशित उमेदवारांच्या कोट्याप्रमाणे बाधित व्यक्तीने कुटूंबातील नामनिर्देशित केलेल्या एका व्यक्तीची भरती करतांना, प्रकल्प प्राधिकारी, अंमलबजावणीखाली असलेल्या त्याच प्रकल्पाच्या बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशित उमेदवारांपैकी शक्यतो ५० टक्क्यांहून कमी नसतील इतक्या उमेदवारांना रोजगार देऊ शकेल;

**स्पष्टीकरण.**- या खंडाच्या प्रयोजनार्थ "कुटुंब" या शब्दप्रयोगाचा अर्थ हा लाभ कुटुंबातील फक्त एका सदस्यास मिळू शकेल या शर्तीस अधीन राहून बाधित व्यक्तीचा विवाहसाथी आणि अशा बाधित व्यक्तीबरोबर रहात असणारा आणि तिच्यावर अवलंबून असणारा तिचा मुलगा, विवाहीत किंवा अविवाहित मुलगी, किंवा भाऊ किंवा बहीण किंवा सून किंवा नातू किंवा नात (यांत मुलीच्या मुलाचा/मुलीचा देखील समावेश होतो) किंवा दत्तक मुलगा किंवा मुलगी असा आहे.

(ड) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता वसवलेल्या नवीन गावठाणात किंवा विस्तारीत विद्यमान गावठांणात नागरी सुविधा पुरविण्याच्या कामाकरिता निधीची तरतुद करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे;

(ई) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता किती जमीन व इतर सुविधा पुरविणे आवश्यक आहे याचा अंदाज घेण्यासाठी प्रकल्पाअन्वये बाधित व लाभधारक होणाऱ्या परिमंडलाविषयीची माहीती व आराखडे प्रकल्पाच्या योजनेच्या आणि अंमलबजावणीच्या निरनिराळ्या टप्प्यात आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना सादर करणे;

(फ) विहित करण्यात येतील अशा कलम १० च्या तरतुदींचे पालन करण्याकरीता लाभधारकांशी केलेल्या कराराची अंमलबजावणी करणे;

अधिकार दुय्यम अधिकाऱ्याकडे प्रत्यांयोजीत करणे.

७. (१) राज्य शासनाला **राजपत्रातील,** अधिसुचनेद्वारे आणि त्यास योग्य वाटतील असे निर्बंध व शर्ती याच्या अधिन राहून आयुक्त किंवा जिल्हाधिकारी किंवा प्रकल्प प्राधिकारी यांना या अधिनियामान्वये किंवा अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी व त्यास नेमुन देण्यात आलेल्या कर्तव्यांपैकी राज्य शासनाला योग्य व इष्ट वाटतील असे अधिकार व कर्तव्ये, त्यास योग्य व इष्ट वाटतील अशा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकणाच्या अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

(२) आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास लेखी आदेश काढून त्याद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यास नेमुन देण्यात आलेली कर्तव्ये आयुक्ताच्या मान्यतेस अधीन राहून, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा.–

(अ) तहसिलदारापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडे; किंवा

(ब) राज्य शासनाच्या अथवा, स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजीत करता येतील.

(३) प्रकल्प प्राधिकरणास लेखी आदेशद्वारे या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार व त्यास नेमुन देण्यात आलेली कर्तव्ये उप-विभागीय अधिकारी/उपअभियंता/सहायक अभियंता/सहायक वनसंरक्षक यांच्यापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

अधिकारी व कर्मचारी यांची अधीनता.

८. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमान्वये नियुक्त केलेला जिल्हाधिकारी, प्रकल्प प्राधिकारी आणि इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे आयुक्ताच्या अधिन असतील.

सल्लागार समिती स्थापन करणे.

९.(१) राज्य शासनास, प्रकल्पबाधित व्यक्तींच्या त्वरीत पुनर्वसनाच्या कामी त्यास सहाय्य करण्याकरिता, त्याच्याकडे किंवा त्यांच्याकडे पाठविण्यात येतील अशा बाबींवर त्याला सल्ला देण्यासाठी व बाधित व्यक्तींच्या पुनर्वसन योजनेशी संबधित असणाऱ्या कोण्यात्याही अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतील अशा बांबीवर त्यास अधिकाऱ्यांना सल्ला देण्यासठी एक किंवा अनेक समित्या स्थापन करता येतील, अशा समितीची रचना, तिच्या कामकाजाचे विनियमन, तिच्या सदस्यांना द्यावयाचे कोणतेही भत्ते किंवा फी असल्यास , असे भत्ते व फी, व त्यांच्याशी आनुषंगिक असणाऱ्या सर्व बाबी ह्या, राज्य शासन , वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

# बाधित व्यक्तींचे पुनर्वसन

१०. (१) राज्य शासन , या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या तरतुदीनुसार, पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या क्षेत्रांतील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध झाल्यास अशा प्रकल्पापासून लाभ मिळत असलेल्या गावातील जमिनिवर किंवा क्षेत्रावर त्यांचे पुनवर्सन करील. बाधित व्यक्तींचे पुनर्वसन.

(२) या अधिनियमाचे कलम १४ किंवा या अधिनियमांच्या किंवा त्यावेळी अंमालात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील कोणत्याही तरतुदी त्यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्य शासनांस या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमाखाली करण्यात आलेल्या इतर तरतुदींनुसार, ज्यांचे पुनर्वसन करावयाचे राहीलेले आहे अशा, अन्य कोणत्याही प्रकल्पामुळे मग त्या प्रकल्पाला या अधिनियामाच्या तरतुदी लागू असोत अथवा नसोत-तसेच अन्य पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या परिमंडलातील शक्य तितक्या बाधित व्यक्तींचे-

(अ) कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पामुळे लाभ झालेल्या परिमंडळातील जमिनीवर किंवा यथास्थिति कलम १४ च्या तरतुदीनुसार जमीन संपादन करून त्याद्वारे इतर गावामधील किंवा क्षेत्रांतील जमिनीवर; किंवा

(ब) भु-संचयातील अन्य कोणत्याही जमिनीवर पुनर्वसन करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(३) राज्य शासन, बाधित व्यक्तींच्या पुनर्वसन प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या नवीन गावठाण्यात किंवा कोणत्याही विद्यमान गावठाण्याच्या विस्तारित भागात विहीत प्रमाणे व पध्दतीनुसार नागरी सुविधांची तरतुद करील आणि अशा सुविधांमध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेलः-

(अ) लोकसंख्येच्या प्रमाणात खुल्या विहिरी, विंधन विहिरी, नलिकाकुप, नळाद्वारे पाण्याचा पुरवठा करण्याची योजना किंवा अन्य कोणत्याही प्रकारे पिण्याच्या पाण्याची कायमची तरतूद;

(ब) प्रसाधनगृहाची सोय असलेली शिक्षण विभागाने विहित केल्याप्रमाणे योग्य दर्जाची शाळा, खेळाचे मैदानासाठी;

(क) ग्रामपंचायतीचे कार्यालय याचे बांधकाम व चावडी किंवा समाज मंदीर;

(ड) योग्य दर्जाचे अंतर्गत खडीचे मार्ग आणि एक डांबरी पोचमार्ग ;

(ई) आवश्यकता असल्यास, बाधित व्यक्तींच्या शेतजमिनीकडे जाणारा पोचमार्ग ;

(फ) रस्त्यावरील दिव्यांसह वीजपुरवठा, आणि आवश्यक असेल तेथे थ्री फेज कनेक्शन ;

(ग) छप्पर, चबुतरा, वीजपुरवठा, पाणीपुरवठा असलेली दहनभुमी आणि आवश्यक असल्यास दफनभुमी, पोचमार्गासह ;

(ह) बांधलेली उघडी गटारे ;

(आय) आर्थिक सहाय्य दिलेले व्यक्तीगत शौचकूप आणि अत्यंत गरजेचे आहे तेथे सार्वजनिक शौचकूप;

(ज) पाण्याच्या हौदासहीत गुरांच्या तळासाठी जमीन;

(के) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेकरीता बस थांब्यांसह जमीन ;

(ल) आवश्यक असेल तेथे मळणीसाठी जमीन, म्हणजेच खळवाडी ;

(म) गायरान जमीन (सरकारी जमीन उपलब्ध असल्यास) ;

(न) बाजारासाठी विकसित जमीन ;

(ओ) गावठाणाच्या भावी विस्तारासाठी जमीन ;

(पी) नवीन गावठाणातील लोकसंख्येच्या प्रमाणात माध्यामिक शाळा आणि दवाखाना किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक डाकघर, मुलासांठी बगीचा इत्यादींसाठी जमीन ;

(क्यु) सार्वजनिक प्रयोजनासाठी नोंदणी झालेल्या संस्थांसाठी जुन्या गावठणामध्ये जमीन ;

(आर) क्रीडांगणासाठी जमीन;

(४) उपरोक्त यादीत दाखवलेल्या सुविधांव्यतिरिक्त, बाधित व्यक्तीचे आधिक्य असलेल्या नवीन गावठणामध्ये जून्या गावठणामध्ये असतील. अशा उचित दर्जाच्या अन्य सर्व सुविधादेखील राज्य शासन पुरविल :

परंतु, सार्वजनिक प्रार्थनास्थळे शासनाद्वारे बांधली जाणार नाहीत. तथापि, जुन्या गावठाणांमधील सार्वजनिक प्रार्थनास्थळांची नुकसान भरपाई संबंधित सार्वजनिक विश्वस्त मंडळाकडे देण्यात येईल आणि जर सार्वजनिक प्रार्थनास्थळे कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त मंडळाच्या मालकीची नसतील तर महाराष्ट्र धार्मिक दाननिधी (पुनर्वसाहतीच्या जागांवरील पुनर्रचना) अधिनियम, १९७० यामध्ये तरतुद केल्याप्रमाणे अशी सार्वजनिक प्रार्थनास्थळे बांधण्यात येतील ;

१९७० चा महा. ३०

(५) वरील उप-खंड (३) व (४) मधील अशा सर्व सुखसोयींवरील खर्च, प्रकल्पाच्या खर्चाचा भाग मानण्यात येईल.

(६) (अ) राज्य शासकीय विभाग सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम स्थानिक स्वराज्य संस्था शासन सहाय्यक संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३ अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग तीन आणि वर्ग चार प्रर्वगातील सर्व सेवांमध्ये बाधित व्यक्तीच्या नामनिर्देशितीसाठी रोजगाराकरिता किमान ५ टक्के प्राथम्य कोटा असेल.

१९६१ चा महा. २४

(ब) राज्य शासनाचे अनुरूप भाग अंशदान इत्यादीच्या रुपात सहाय्य मिळणाऱ्या लाभधारक व्यक्ती, संस्था, कंपन्या, कारखाने, साखर कारखाने, सुत गिरण्या आपल्या वर्ग तीन आणि वर्ग चार संवर्गाच्या पदांकरीता किंवा तत्सम अतांत्रिक कर्मचारी वर्गाकरिता बाधित व्यक्तीच्या नामनिर्देशींतीसाठी किमाण ५ टक्के रोजगाराची तरतूद करतीलः

परंतू वरील प्राथम्यक्रम हा खुल्या आणि विभिन्न आरक्षण प्रवर्गामधील यथाप्रमाण पसंतीक्रम समजला जाईल;

(क) जिल्हाधिकारी जिल्ह्यातील सेवाप्रवेशाची स्थिती दर्शविणारी नोंदवही ठेवील आणि बाधित व्यक्तींच्या नामनिर्देशित उमेदवारांच्या भरतीमधील अनुशेष दुर केला जात असल्याची खात्री करून घेईल. तथापि, अशी कोणतीही भरती करतांना, नामनिर्देशित व्यक्तींमधून अशा भरती केलेल्या व्यक्तींची संख्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही.

बाधित आणि लाभधारक परिमंडलामधील अधिसुचित करावयाची क्षेत्रे.

**११.** (१) ज्यांना हा अधिनियम लागू होतो, ज्यामध्ये प्रकल्पाचा संपुर्ण किंवा पुष्कळसा भाग असेल अशा महसूल विभागाचा आयुक्त अशा प्रकल्पाच्या संबंधात **राजपत्रातील** अधिसुचेद्वारे -

(अ) अशा प्रकल्पाच्या बाधित किंवा लाभधारक परिमंडलामध्ये येण्याची शक्यता आहे अशी गांवे किंवा क्षेत्रे, कोणतीही असल्यास, विनिर्दिष्ट करील.

(ब) कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध ज्यांना लागू होतील असे , अशा गावातील किंवा क्षेत्रातील धारण जमिनींचे क्षेत्र तात्पुरते विनिर्दिष्ट करील.

(२) जी गावे किंवा क्षेत्रे बाधित आणि लाभधारक क्षेत्रे असण्याची शक्यता आहे अशा गांवामध्ये किंवा क्षेत्रामध्ये दवंडी पिटून आणि अशा अधिसुचनेची एक प्रत या परिमंडलात एखाद्या किंवा अनेक ठळक जागी गावाच्या चावडीवर आणि कोणतीही ग्राम पंचायत असल्यास, तिच्या कार्यालयात आणि तसेच तहसीलदाराच्या, जिल्हाधिकाऱ्याच्या, प्रकल्प प्राधिकाऱ्याच्या आणि आयुक्तांच्या कार्यालयात लावून अशी अधिसुचना जाहीर करण्यात येईल.

जमिनिचे हस्तांतरण, पोट-विभागणी, विभाजन, रुपांतरण किंवा सुधारणा यावरील निर्बंध.

**१२.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात, काहीही अंतर्भुत असले तरीही कलम ११ खालील अधिसुचना **राजपत्रात** प्रसिध्द झाल्यानंतर व कोणत्याही विशिष्ट गावाच्या किंवा त्यातील क्षेत्राच्या लाभधारक परिमंडलातील आणखी कोणतीही जमीन या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक नाही अशा आशयाची घोषणा जिल्हाधिकाऱ्याकडून करण्यात येईपर्यंत, कलम ११ खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावातील किंवा क्षेत्रातील कोणत्याही कृषि जमिनी आयुक्ताची लेखी परवानगी असेल त्या व्यतिरिक्त-

(अ) विक्रीच्या रुपाने (दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करतांना केलेली विक्री धरून) किंवा देणगीच्या, विनियमाच्या पट्टयाच्याद्वारे किंवा अन्य रूपाने हस्तांतरीत करता येणार नाही.

(ब) त्यांची पोट-विभागणी (कोणत्याही न्यायालयाची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकूमनामा, निवाडा, किंवा आदेश याद्वारे केलेली पोट विभागणी धरून) करता येणार नाही; किंवा

(क) त्यांचे विभाजन (कोणत्याही न्यायालयाचा किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशान्वये केलेले विभाजन धरुन) करता येणार नाही ; किंवा

(ड) त्याचे कृषीतर प्रयोजनार्थ रूपांतरण करता येणार नाही; किंवा

(ई) महत्वाची भर घालून आणि फेरफार करून सुधारणा करता येणार नाही.

(२) जमिनीच्या हस्तांतरणामुळे, पोट-विभागणीमुळे, विभाजनामुळे, रूपांतरणामुळे किंवा सुधारणेमुळे या अधिनियमाचा उद्देश विफल होण्याची शक्यता आहे असे आयुक्तांचे मत होईल तर, त्यास अशी परवानगी देण्याचे नाकारता येईल किंवा या अधिनियमाचा उद्देश अंमलात आणण्यासाठी त्यांस ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने अशी सर्वसाधारण किंवा विशेष परवानगी देता येईल, अशा शर्तीमध्ये अशी परवानगी देण्याच्या लगतपुर्वी असलेल्या कोणत्याही धारण जमिनीच्या आधारे कलम १४ खाली सक्तीने संपादन करण्यास पात्र असलेल्या जमिनीच्या क्षेत्रावर या परवानगीचा कोणताही परिणाम होता कामा नये, या शर्तीचाही समावेश असेल.

(३) पोट-कलम (१) चे किंवा पोट-कलम (२) खाली घातलेल्या कोणत्याही शर्तीचे, उल्लंघन करून केलेले जमिनींचे कोणतेही हस्तांतरण, पोट-विभागणी , विभाजन, रुपांतरण किंवा सुधारणा निरर्थक व अप्रवर्ती असेल

(४) कलम ११ खालील अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गांवातील किंवा क्षेत्रातील आणि जिला या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध लागू आहेत अशा जमिनीचे अशी अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकास किंवा तत्पुर्वी, करण्यात आलेले कोणतेही हस्तांतरण, पोट विभागणी, विभाजन किंवा सुधारणा ही, कलम १४, पोट-कलम (४) च्या प्रयोजनासाठी पुढील गोष्टी असल्याशिवाय विचारात घेतली जाणार नाहीः –

असे हस्तांतरण, पोट-विभागणी, विभाजन, रुपांतरण किंवा सुधारणा ही,–

(अ) त्याची मोजमापे व हद्दी ठरवूनच केलेली असली पाहीजे व रीतसर प्रमाणन केल्यानंतर संबध्द ग्राम अभिलेखात त्यासंबधात तशी नोंद केलेली असली पाहीजे ;

(ब) तशा अर्थाच्या हुकूमनाम्याद्वारे ते केलेले असले पाहीजे आणि रीतसर प्रमाणन केल्यानंतर संबध्द ग्राम अभिलेखात त्यासंबधीच्या नोंदी केलेल्या असल्या पाहिजेत किंवा संबध्द ग्राम अभिलेखात त्यानुसार नोंदी करण्याकरीता महसूल प्राधिकाऱ्यापुढे त्याबाबतची कार्यवाही प्रलंबित असली पाहीजे.

**१३.** (१) जमेल तितक्या लवकर जिल्हाधिकारी, कलम ११, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि राजपत्रात तसेच, बाधित व लाभधारक परिमंडळातील अशा गावांचा व क्षेत्राचा समावेश असणाऱ्या स्थानिक क्षेत्रामध्ये प्रसृत होणाऱ्या मराठी भाषेतील एका दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून, पोट कलम (१) खंड (अ) आणि (ब) खाली येणाऱ्या त्याच्या जिल्ह्यामध्ये जमिनीच्या संबंधात, आक्षेप किंवा सूचना मागविणारी जाहीर नोटीस देईल. बाधित व लाभधारक क्षेत्रे घोषीत करणे.

(२) अशा क्षेत्रातील जमिनीमध्ये हितसंबध असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही आक्षेप किंवा सूचना असल्यास, असे आक्षेप किंवा सूचना ज्या तारखेस अशी जाहीर नोटीस संबंधित गावामध्ये किंवा क्षेत्रामध्ये दवंडी पिटवून प्रसिध्द करण्यात आली असेल त्या तारखेपासून किंवा ती ज्या तारखेस पूर्वी म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येईल त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, या दोहोंपैकी नंतरची असेल अशा तारखेस, जिल्हाधिकाऱ्याकडे करता येतील आणि जिल्हाधिकारी, त्यासंबंधीच्या त्याच्या अहवालासह अशा तऱ्हेने पाठविण्यात आलेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना शक्य तितक्या लवकर आयुक्ताकडे पाठवील. आयुक्त, अहवालाचा आणि कोणतेही आक्षेप किंवा सूचना असतील तर त्यांचा विचार करून त्यास योग्य वाटेल असा आदेश संमत करील.

(३) आयुक्त, कलम ११ खालील अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत तीन वर्षापेक्षा उशीरा नाही आणि इतर प्रकल्पांच्या बाबतीत एका वर्षापेक्षा उशीरा नाही अशा वेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तसेच कलम ११, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अशी अधिसूचना प्रसिध्द करून पुढील बाबी घोषीत करील,–

(अ) प्रकल्पाखालील बाधित परीमंडलाच्या क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या क्षेत्राची व्याप्ती,

(ब) तो पाटबंधारे प्रकल्प असेल तर, प्रकल्पाखालील लाभधारक पीरमंडलाच्या क्षेत्राची व्याप्ती,

(क) अनुसूचीच्या भाग दोनमध्ये उल्लेख केलेल्या टप्प्यांपैकी कोणता टप्पा, लाभधारक परिमंडलातील जमिनीच्या संपादनाच्या प्रयोजनासाठी, अशा प्रकल्पास लागू असेल तेः

परंतू आयुक्ताने, स्वतंत्र अधिसूचनूद्वारे, बाधित लाभधारक परिमंडल अधिसूचित करणे हे विधिसंमत आहे.

(४) प्रकल्प अधिकारी, कलम ११ अन्वये अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत बाधित परिमंडलाच्या किमान २५ टक्के क्षेत्राचा आणि इतर प्रकल्पांच्या बाबतीत १०० टक्के क्षेत्राचा तपशीलवार नकाशा जिल्हाधिकाऱ्याला सादर करील.

(५) प्रकल्पाच्या अंमलबाजावणीच्या काळात कोणत्याही वेळी, पोट-कलम (३) खालील अधिसूचनेत नमूद केलेल्या क्षेत्रात कोणताही बदल करणे आवश्यक आहे याबद्दल प्रकल्प प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, तो असा बदल, त्या संबंधातील कारणे , योजना आणि तपशील यांसह जिल्हाधिकाऱ्यामार्फत आयुक्तास कळवील.

(६) पोट-कलम (५) अन्वये कळविण्यात आलेली माहिती आणि जिल्हाधिकाऱ्यांचा कोणताही अहवाल, असल्यास, तो मिळाल्यानंतर, आयुक्त प्रकल्प प्राधिकाऱ्यांनी दिलेली आणि जिल्हाधिकाऱ्यांचा कोणताही अहवाल असल्यास, त्यातील कारणे विचारात घेऊन आणि त्यास योग्य वाटेल अशी कोणतीही चौकशी असल्यास, ती केल्यावर पोट-कलम (१),(२) आणि (३) मध्ये घालून दिलेल्या रीतीने बदल करू शकेल.

(७) वरील पोट-कलम (३) किंवा (६) मध्ये तरतूद केलेल्या अधिसूचनेच्या प्रसिध्दीनंतर, यथास्थिती कलम १२ च्या पोट-कलम (१) मध्ये घालून दिलेल्या निर्बंध, कलम ११ पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या गावांतील प्रकल्पाच्या लाभधारकास परिमंडलात किंवा बाधित परिमंडलात समाविष्ट न केलेल्या जमिनींना लागू असणार नाहीत.

या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी जमीन खरेदी करण्याचा किंवा जमीन संपादन करण्याचा अधिकार.

**१४.** (१) आयुक्तास किंवा त्याने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या जिल्हाधिकाऱ्यास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन खरेदी करता येईल किंवा तिची अदलाबदल करता येईलः

परंतु, या पोट-कलमा अन्वये, जमीन खरेदी करण्यासाठी भरण्यात येणारी रक्कम ही, अदमासे, पोट-कलम (२) च्या तरतुदीनुसार जमीन संपादन करण्यात आली असता अशा जमिनीकरता भरपाई म्हणून देण्यात यावयाच्या रकमेइतकीच असेल.

(२) या कलमातील तरतुदींच्या अधीनतेने आयुक्तास या अधिनियमाचे प्रयोजन पार पाडण्यासाठी,भुमी-संपादन अधिनियमन १८९४ खाली सक्तीने सुध्दा जमीन संपादन करता येईल. आणि उक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी केलेले कोणत्याही जमीनीचे संपादन हे, त्या अधिनियमाच्या अर्थातंर्गत सार्वजनिक प्रयोजन असल्याचे मानण्यात येईल. १८९४ चा १.

(३) आयुक्तास, व्यवहार्य असेल तेथवर अनुसूचिच्या भाग एक मधील तरतुदींना अनुसरून बाधित परिमंडालातील गावठाणात समाविष्ट केलेल्या जमिनी संपादन करता येतील.

(४) कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडालातील ज्या बाधित व्यक्तींचे पुनर्वसन व्हावयाचे आहे अशा व्यक्तींसकट पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडलातील बाधित व्यक्तींचे जमिनीवर पुनर्वसन करण्याच्या प्रयोजनार्थ, आयुक्तास, कलम १३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेत घोषित केलेल्या टप्प्यानुसार प्रकल्पाच्या लाभधारक परिमंडलातील धारण जमिनीमधून आणि आवश्यकते प्रमाणे इतर कोणत्याही गांवातील किंवा क्षेत्रांतील जमिनीमधून जमिनीचे संपादन करता येईल.

(५) या कलमान्वये संपादन केलेल्या सर्व जमिनी हा भुसंचयाचा भाग बनेल.

(६) जी बाधित व्यक्ती हक्कदार असूनही परिमंडलातील पर्यायी जमीन घेऊ इच्छित नाही तिला, तिला देऊ करण्यात आलेल्या जमिनीच्या किंमतीच्या पन्नास टक्के रक्कम देण्यात येईल, असे मूल्य, *मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये तयार करण्यात आलेल्या, मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९५५ अन्वये मुख्य नियंत्रण प्राधिकरणाने दराच्या वार्षिक विवरणपत्राच्या नमुन्यात संबध्द वेळी निर्धारित आणि जाहीर केलेल्या जमिनीच्या दरांच्या आधारे विहित रितीने अंदाजित केलेल्या, खऱ्या बाजार मूल्यांच्या आधारे काढण्यात येईल. १९५८ चा मुंबई ६०.

पुनर्वसनाचे प्रस्ताव तयार करणे व ते प्रसिध्द करणे.

**१५.** आयुक्त याबाबतीत देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधिन राहून, कलम १३, पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत एखाद्या प्रकल्पाखालील बाधित परिमंडलातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता जिल्हाधिकारी, परिस्थितीनुसार वेळोवेळी, एका किंवा अधिक टप्प्यात प्रस्ताव तयार करील व कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये घालून दिलेल्या रितीने, असे प्रस्ताव अंतर्भूत नसलेली एक नोटीस अशा बाधित व्यक्तींच्या माहितीकरीता प्रसिध्द करील.

जमीन देणे व जमिनीचे अभिहस्तांकन आणि विशेष अनुदान देणे.

**१६.** (१) कलम १५ अन्वये प्रसिध्द केलेल्या योजनेमधील प्रयोजनासाठी दाखविलेल्या क्षेत्रातील जमीन किंवा भूखंड किंवा दोन्ही घेण्यास इच्छुक आहे अशी कोणतीही पात्र बाधित व्यक्ती, जिल्हाधिकाऱ्याकडे, जमीन किंवा भूखंड मिळण्याकरिता विहीत नमुन्यांमध्ये अर्ज करू शकेलः आणि विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधिनतेने, जिल्हाधिकाऱ्याने-

(अ) कलम १४ अन्वये संपादित केलेली जमीन अशा बाधित व्यक्तींने पूर्वीच धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटाविषयक स्थितीसह त्या व्यक्तीस मंजूर करणे.

---

* सन २०१२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ नोंद क्र.६७ द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम" अशी सुधारणा करण्यात आली.

(ब) अशा बाधित व्यक्तीस त्याने पूर्वीच धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटाविषयक स्थितीसह नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील भूखंड मंजूर करणे, आणि अशा भूखंडावर घर बांधण्यासाठी, विशेष अनुदान म्हणून दहा हजार रुपये मंजूर करणे, विधिसंमत असेलः

अनुसूचीतील भाग तीन व चार मधील तरतुदनुसार शक्य असेल तेथवर, अशारीतीने आणि विहित केलेल्या अशा अटी व शर्तीनुसार करणे विधि संमत असेलः

परंतु –

(एक) जर पोट-कलम १, उपखंड (अ) आणि (ब) अन्वये जमिनीची वाटपग्राही व्यक्ती ही भोगवटादार वर्ग-दोन मध्ये मोडणारी असेल, तर ती दहा वर्षानंतर विहीत अधिमूल्य भरून, ती जमीन भोगवटादार वर्ग-एक मध्ये बदलून घेण्यास हक्कदार असेलः

(दोन) कलम २, खंड (२) च्या उप खंड (ड) मध्ये निर्दीष्ट केलेली बाधित व्यक्ती ही राज्य शासनाच्या इंदीरा आवास योजनेच्या आधारे बांधलेले घर मिळण्यास पात्र असेल.

(तीन) कलम २, खंड(२), उप खंड (ई) मध्ये निर्देश करण्यात आलेली बाधित व्यक्ती, केवळ खंड (ब) खालील भूखंड मिळण्यास पात्र असेलः

(चार) पोट-कलम (२) व (३) च्या तरतुदीस अधीन राहून, खंड (अ) किंवा (ब) अन्वये देण्यात आलेल्या जमिनीची किंवा भूखंडाची भोगवट्याची किंमत, वरील उप-खंड दोन वगळता, विहित करण्यात येईल अशा रीतीने निर्धारित व प्रदान करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जमीन किंवा भूखंड दिला जाण्यास पात्र असणारी बाधित व्यक्ती, पुढील कारणावरून अशी जमीन किंवा भूखंड मिळण्याचा आपला हक्क गमाविल–

(अ) त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याकडून तिला नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या मुदतीत , तिला देऊ करण्यात आलेली जमीन किंवा भूखंड स्वीकाण्याची तिची इच्छा असल्याचे कळविण्यात ती कसूर करील तर, किंवा

(ब) बाधित परिमंडलातील तिची जी जमीन संपादित करण्यात आली तिच्या मोबदल्यात तिला मिळालेल्या नुकसानभपाईची रक्कम किंवा पोट-कलम (१) अन्वये तिला मंजूर करण्यात यावयाच्या जमिनीची संभाव्य किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या पासष्ट टक्के इतकी रक्कम जमिनीच्या भोगवट्याची किंमत म्हणुन अशा बाधित व्यक्तीस अशी नुकसानभरपाई देण्याच्या वेळेस जिल्हाधिकाऱ्याकडे जमा करण्यात ती कसूर करील तर.

(३) पोट-कलम (२) च्या खंड (ब) अन्वये रकमेचे प्रदान करण्यात आल्यानंतर बाधित व्यक्तीने तिला दिलेल्या जमिनीच्या भोगवट्याच्या किंमतीपोटी द्यावयाची उरलेली रक्कम, विहित करण्यात येईल अशारीतीने व अशा हप्त्यामध्ये तिच्याकडून बिनव्याजी वसूल करण्यात येईलः

परंतु, अशा वसुलीचा पहीला हप्ता, तिला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर एका वर्षाने सुरु होईल.

(४) राज्य शासन, ज्यांनी या कलमाच्या पोट-कलम (२) च्या खंड (ब) नुसार रक्कम जमा केली आहे पण ज्यांना लाभधारक परिमंडल क्षेत्रात जमिनीचे नियतवाटप करण्यात आलेले नाही अशा सर्व बाधित व्यक्तींना विशेष अनुदान देईल, आणि या विशेष अनुदानाचा दर, त्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष विस्थापनाच्या दिनांकापासून लाभधारक परिमंडळ क्षेत्रात जमिनीचे नियतवाटप करण्यात येईपर्यंतच्या कालावधीत दरमहा रु.४०० एवढा असेल.

(५) प्रकल्पबाधित व्यक्तीकडून संपादन करण्यात आलेली जमीन जोपर्यंत पाटबंधारे प्रकल्पाचे घळ भरुन काढण्याचे काम आणि खाणकाम धरणाची जागा इत्यादी कामासाठी वापरण्यात येत नाही तोपर्यंत त्या प्रकल्पबाधित व्यक्तीला भाडेपट्ट्याने देण्यास या अधिनियमाखाली कोणत्याही गोष्टीमुळे प्रकल्प प्राधिकाऱ्याला प्रतिबंध होणार नाही.

(६) बाधित व्यक्तीकडून लाभधारक परिमंडल क्षेत्रातील संपादन करण्यात आलेली व जी कोणत्याही कारणासाठी असो, अद्याप त्याच्या ताब्यात असेल ती जमीन, कोणत्याही पात्र प्रकल्पबाधित व्यक्तीस प्रदान करण्यात येईपर्यंत, त्या प्रकल्पाबाधित व्यक्तीला भाडेपट्टयाने देण्यास या अधिनियमाखालील कोणत्याही गोष्टीमुळे जिल्हाधिकाऱ्याला प्रतिबंध होणार नाही.

प्रकल्पबाधित व्यक्तीला विकसित जमीन मंजूर करण्याचा अधिकार.

**१७.** [1] [(१)] जमीन संपादन करणारी संस्था जेंव्हा प्रकल्पाच्या प्रयोजनांसाठी संपादन केलेल्या जमिनीतील विकसित जमीन निकालात काढत असेल, तेंव्हा शासनाने विहित केलेली रक्कम भरल्यावर प्रकल्पबाधित व्यक्तीला, त्याच्याकडून संपादीत केलेल्या जमिनीपैकी १२ १/२ टक्क्यांऐवजी विकसित जमीन मिळण्याचा हक्क असेल.

[1] (२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने, प्रकल्पबाधित व्यक्तींना विकसित जमिनीऐवजी प्रकल्पाचे स्वरूप व स्थानिक व परिस्थिती यांचा विचार करून, राज्य शासन अधिसूचित करील असे पर्यायी लाभ देणे विधिसंमत असेल.]

मांडणीचे कार्यान्वयन प्रकल्प प्राधिकाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाने करणे आणि ते पूर्ण झाल्यानंतर जिल्हापरिषेदेकडे ते निहित होणे.

**१८.** नवीन गावठाणाच्या किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्ताराच्या प्रत्येक मांडणीचे कार्यन्वयन, सार्वजनिक उपयुक्तता, नागरी आणि इतर सुखसोयी व सेवा यांच्याशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर, संबंधित प्रकल्प प्राधिकाऱ्याकडून करण्यात येईल किंवा आयुक्त, त्यास तसे करणे योग्य वाटेल तर, लेखी आदेशाद्वारे त्यास योग्य वाटेल अशा यंत्रणेकडे ते सोपवील. सदर ची कामे सर्व बाबतीत पूर्ण झाल्यावर आणि जिल्हाधिकाऱ्याने तशा आशयाचे स्वतःची सही व मोहोर यांनिशी प्रमाणपत्र दिल्यावर उक्त कामे नवीन गावठाणात किंवा, यथास्थिती, विद्यमान गावठाणाच्या विस्तार क्षेत्रात समाविष्ट असलेल्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या जिल्हा परिषदेकडे, तिने ही कामे महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या तरतुदीनुसार विकास योजनेची कामे म्हणून हाती घेतली असल्याचे मानून निहित होतील. १९६२ चा महा. ५.

भाराचे हस्तांतरण.

**१९.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, बाधित व्यक्तीने बाधित परिमंडलात धारण केलेल्या कोणत्याही जमिनीवर, गहाण, ऋण किंवा अन्य कोणत्याही भाराचा बोजा असेल त्या बाबतीत,असे गहाण, ऋण किंवा अन्य भार त्या जमिनीवरून हस्तांतरीत झाल्याचे व अशा बाधित व्यक्तीला कलम १६ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीशी संलग्न झाला असल्याचे मानण्यात येईल व गहाणधारक, धनको किंवा यशास्थिती, अन्य भारस्वामी त्यानुसार आपले हक्क बजावील.

(२) पोट-कलम (१) अन्वये गहाण, ऋण किंवा अन्य भार ज्या जमिनीकडे हस्तांतरित झाला असेल त्या जमिनीचे बाजारमूल्य, असे गहाण, ऋण किंवा अन्य भार ज्या जमिनीवरून हस्तांतरित झाला असेल त्या मूळ जमिनीच्या बाजारमूल्यापेक्षा कमी असेल तर, गहाणधारकास, धनकोस किंवा यथास्थिती, अन्य भारस्वामीस त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, जिल्हाधिकारी ठरवून देईल इतकी नुकसानभरपाई अशा जमिनीचा मालक असलेल्या बाधित व्यक्तीकडून मिळण्याचा हक्क असेल.

---

(१) सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ कलम २ द्वारे कलम १७ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

(३) पोट-कलम (१) व (२) मध्ये किंवा कोणत्याही संविदेत किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, गहाणधारक , धनको किंवा यथस्थिती, भारस्वामी , असे गहाण, ऋण किंवा भार या अन्वये दिलेल्या कोणत्याही रकमेसाठी किंवा कर्जासाठी अशी रक्कम वा कर्ज या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेले असो वा नंतर देण्यात आलेले असो - - व्याजादाखल कोणत्याही प्रकारे दिलेल्या मुद्दलाच्या किंवा कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम वसूल करणार नाही.

प्रकल्प पूर्ण झाल्यावर ज्यावर बांधकाम करण्यात आले आहे अशा संपादित जमिनी त्यावरील बांधकामसहित निकालात काढणे.

**२०.** ज्या शासनाकडून, प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी कोणतीही जमीन संपादन करण्यात आलेली असेल आणि जीवर शासन किंवा अन्य कोणतेही निमशासकीय प्राधिकरण किंवा संस्था यांनी कोणतीही कार्यालये किंवा इतर बांधकामे उभारली असतील आणि असे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अशी जमीन त्यावरील बांधकामासहित, शासनाला किंवा अशा प्राधिकरणाला किंवा निकायाला आवश्यक असणार नाही, अशा वेळी अशी जमीन अशा बांधकामासंहीत विहित केलेल्या रीतीने आणि विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर निकालात काढण्याचा अधिकार राज्य शासनाला देण्यात आला आहे.

## प्रकरण चार

## संकीर्ण

शास्ती.

**२१.** (१) जर कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखाली जाणूनबुजून खोटी माहिती पुरवील, किंवा या अधिनियामान्वये बाधित व्यक्तीला देण्यात आलेली जमीन कसण्यास अटकाव करील तर तिला दोषसिध्दीअंती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा या पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतीलः

परंतु, न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाची विरुध्द अशी विशेष व पर्याप्त कारणे नसतील तेंव्हा असा द्रव्यदंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(२) जो कोणी या अधिनियामान्वये शिक्षापत्र असलेला कोणताही अपराध करण्यास चिथावणी देईल किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील, त्याने असा अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि दोषसिध्दीनंतर त्याला अशा अपराधाकरीता पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आलेली शिक्षा करण्यात येईल.

(३) वरील पोट-कलमे (१) व (२) मधील कोणत्याही बाबीमुळे जिल्हाधिकाऱ्यास संक्षिप्त चौकशी करण्यास आणि अडथळे तात्काळ दूर करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(४) वरील पोट-कलम (३) नुसार जिल्हाधिकाऱ्याने दिलेला आदेश पाळण्यास कोणतीही व्यक्ती नकार देईल किंवा असा आदेश पाळण्यास कसूर करील, तर अशी व्यक्ती, तिने असा अडथळा दूर करीपर्यंत दर दिवशी रुपये १,००० पर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(५) कोणत्याही लाभधारकाने कलम १०, पोट-कलम ६ च्या खंड (अ) आणि (ब) च्या तरतुदींचे उल्लंघन केले तर, जिल्हाधिकारी संक्षिप्त चौकशी केल्यानंतर पाणीपुरवठा आणि विद्युतपुरवठा थांबविण्याचे, सहायक अनुदान रोखून धारण्याचे किंवा शासनाने लाभधारकाला दिलेले भाग अनुदान परत मागविण्याचे आदेश देऊ शकेल.

परंतू, यथास्थिती पोट-कलमे (३), (४) किंवा (५) अन्वये काढण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुध्द १५ दिवसाच्या कालावधीच्या आत आयुक्ताकडे अपील दाखल करता येईल आणि आयुक्त असे अपील दाखल करण्यात आल्याच्या दिनांकपासून एक महिन्याच्या आत ते अपील निकालात काढील.

शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी आयुक्त इत्यादींना सहाय्य करणे.

**२२.** कोणत्याही विभागातील शासनाचा प्रत्येक अधिकारी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी जेव्हा त्यास तसे करण्यास सांगण्यात येईल तेव्हा कोणत्याही आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास किंवा प्रकल्प प्राधिकाऱ्यास किंवा या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबाजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ यथोचितरित्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा यंत्रणेस सहाय्य करण्यास बांधलेला असेल.

या अधिनिमान्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.

**२३.** या अधिनियमान्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानन्यात येईल. १८६० चा ४५.

अधिकारितेस प्रतिबंध.

**२४.** या अधिनियामाद्वारे किंवा तदन्वये जो प्रश्न प्रकल्प प्राधिकाऱ्याने, जिल्हाधिकाऱ्याने, आयुक्ताने किंवा राज्य शासनाने मिटविणे, निर्णित करणे किंवा हाताळणे आवश्यक असेल असा कोणताही प्रश्न मिटविण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा तो हाताळण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही.

या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईस संरक्षण.

**२५.** या अधिनियामान्वये जी सद्हेतूने केली असेल किंवा करण्याचे योजलेले असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासनास स्थानिक प्राधिकरणे किंवा कोणताही लोकसेवक यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचे अधिकार.

**२६.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील. अशा नियमांस, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी फी आकारण्याची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियामान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरीता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशारीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापुर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य होईल (किंवा तो नियम करु नये म्हणुन दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल) तर व त्यांनी असा निर्णय राजपत्रात अधिसूचित केला तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती तो मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियामान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

राज्याच्या धोरणासंबंधात घोषणापत्र.

**२७.** याद्वारे असे घोषित करण्यात येते की, भारताच्या संविधनाचा अनुच्छेद ३९ याच्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेले उद्दिष्ट साध्य करण्याकरीता व प्रकल्पाचे कार्यान्वयन करणे व कोणत्याही प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तीचे पुनर्वसन करणे व त्याकरीता जमिनी संपादन करुन अशा कोणत्याही जमिनी प्रकल्पबाधित व्यक्तींकडे हस्तांतरीत करणे यासंबंधातील राज्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता हा अधिनियम करण्यात येत आहे.

## प्रकरण पाच

## निरसन व व्यावृत्ती

निरसन व व्यावृत्ती.

**२८.** या अधिनियमाच्या प्रारंभापासून 'महाराष्ट्र' प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६, हा याद्वारे निरसित होईलः १९८९ चा महा. ३२.

परंतु, अशा निरसनामुळे पुढील गोष्टींवर परीणाम होणार नाही :–

(अ) अशारीतीने निरसित केलेल्या कायद्याची पुर्वी केलेली अंमलबाजावणी अथवा त्याखाली यथोचितरित्या केलेली किंवा सोसलेली कोणतीही गोष्ट ; किंवा

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या कायद्यान्वये संपादित केलेला, उपार्जित झालेला कोणताही हक्क किंवा विशेष हक्क अथवा ओढवलेले बंधन किंवा दायित्व ; किंवा

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाविरुध्द केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबत ओढवून घेतलेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा ; किंवा

(ड) पूर्वोक्त असे कोणतेही हक्क, विशेष अधिकार, बंधन, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांच्याबाबत कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, कायदेविषयक कार्यवाही किंवा उपाययोजना आणि जणूकाही हा अधिनियम संमत झाला नाही असे समजून असे कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, कायेदेविषयक कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल. चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती , समपहरण किंवा शिक्षा लादता येईलः

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकात व या अधिनियमात इतरत्र करण्यात आलेल्या कोणत्याही व्यावृत्तीविषयक तरतुदीस अधीन राहून, अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या कायद्याच्या तरतुदीअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट, कोणतीही कारवाई (कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी व त्याच्याशी संबंधित किंवा पूरक असेल अशी कोणतीही कामे धरुन) करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश, हे जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, ते या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात किंवा काढण्यात आल्याचे समजण्यात येईल व या अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट, कारवाई, नियम किंवा काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश याद्वारे स्पष्टपणे किंवा गर्भितार्थाने अधिक्रमित करण्यात आल्याखेरीज व करण्यात येईतोपर्यंत, ती गोष्ट, कारवाई, नियम किंवा आदेश तद्नुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

**२९.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, त्या प्रसंगी आवश्यक असेल त्याप्रमाणे राज्य शासनाला, आदेशाद्वारे, अशा तरतुदींशी विसंगत नसलेली व अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक आणि उचित वाटेल अशी, कोणतीही गोष्ट करता येईलः अडचण दूर करणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर राज्य शासन या कलमाखाली कोणताही आदेश काढणार नाही.

## अनुसूची

[कलमे १३ (३) (क) आणि १४ (३) व (४) आणि १६ (१) पहा]

### भाग एक

| प्रकल्पासाठी संपादन केलेल्या गावठाणातील घरांची टक्केवारी (१) | गावठाणात समाविष्ट असलेल्यापैकी संपादन करावयाच्या जमिनीची व्याप्ती (२) |
|---|---|
| (अ) गावठाणातील घरांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी घरे किंवा जमिनीपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी जमिनी प्रकल्पासाठी संपादन करण्यात येतात. | (अ) काही नाही. |
| (ब) गावठाणातील घरांपैकी ७५ टक्के घरे प्रकल्पासाठी संपादन करण्यात येतात. | (ब) संपूर्ण गावठाणात समाविष्ट सर्व जमिनी. |

**भाग एक-चालू**

| (१) | (२) |
|---|---|
| (अ) गावठाणात समाविष्ट क्षेत्र प्रकल्पासाठी संपादन करण्यात आलेले नाही, परंतु गावातील शेतजमिनीच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत आणि गावातील लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या उर्वरीत क्षेत्राची व्याप्ती प्रत्येक वर्षी १५ डिसेंबरपर्यंत लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या गाळपेर जमिनी धरून गावाच्या लागवड केलेल्या क्षेत्राच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. | (ब) संपूर्ण गावठाणात समाविष्ट सर्व जमिनी. |

परंतू, एखाद्या गावठाणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, वरील (अ), (ब) व (क) मधील निकषाची प्रतिपूर्ती होत नसेल, परंतू, परिस्थितीमुळे घरांचे किंवा जमिनीचे संपादन करणे भाग असेल त्याबाबतीत शासनास आपल्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात, संपूर्ण गावठाणातील सर्व घरे किंवा सर्व जमिनी यांचे संपादन [ करण्याची मुभा असेल आणि त्या प्रकरणी असे संपादन हे सार्वजनिक प्रयोजनासाठी ] करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

**भाग दोन**

| धारण जमिनीचा आकार (१) | संपादन करावयाचे क्षेत्र (२) |
|---|---|
| **टप्पा-एक** | |
| (अ) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसेल. | (अ) काही नाही. |
| (ब) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक असेल आणि २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसेल. | (ब) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा जादा असलेले परंतू ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असेल आणि ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसेल. | (क) २ हेक्टर आणि २ आर पेक्षा जादा असलेले परंतू ८० आर पेक्षाअधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असेल आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसेल. | (ड) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा जादा असलेले परंतू, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असेल आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसेल. | (ई) २ हेक्टर आणि ८३ आर पेक्षा जादा असलेले परंतू, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असेल आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसेल. | (फ) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा जादा असलेले परंतू, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असेल. | (ग) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा जास्त असलेले संपूर्ण क्षेत्र. |

**भाग दोन-चालू**

| धारण जमिनीचा आकार (१) | संपादन करावयाचे क्षेत्र (२) |
|---|---|
| **टप्पा-दोन** | |
| (अ) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले आणि ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) २ हेक्टर आणि ८३ आर पेक्षा अधिक होणारे परंतू ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ३ हेक्टर आणि ६४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक होणारे संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-तीन** | |
| (अ) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ३ हेक्टर आणि ६४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ४ हेक्टर आणि ४४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक होणारे संपूर्ण क्षेत्र. |

**भाग तीन-चालू**

| धारण जमिनीचा आकार (१) | संपादन करावयाचे क्षेत्र (२) |
|---|---|
| **टप्पा-चार** | |
| (अ) ४ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ४ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ४ हेक्टर आणि ४४ आर पेक्षा अधिक होणारे परंतू ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ५ हेक्टर आणि २५ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ८९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, २ हेक्टर आणि २४ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ८ हेक्टर आणि ८९ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक होणारे संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-पाच** | |
| (अ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ५ हेक्टर आणि २५ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |

**भाग दोन-समाप्त**

| धारण जमिनीचा आकार (१) | संपादन करावयाचे क्षेत्र (२) |
|---|---|
| (ई) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ६ हेक्टर आणि ६ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक असलेले आणि ९ हेक्टर आणि ७१ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक होणारे परंतू, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ९ हेक्टर आणि ७१ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक होणारे संपूर्ण क्षेत्र. |

१९४७ चा मुंबई ६२. परंतू, कोणत्याही टप्प्यानुसार, संपादन केलेली जमीन २० आर पेक्षा कमी असणार नाही किंवा ती सन २०१२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूची नोंद क्र. २९ द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात महाराष्ट्र धारणजमिनीचे तुकडे पाडण्यात प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम सुधारणा करण्यात आली. दि. १/५/१९६० पासून अनुसूची २९ मध्ये नोंद घेण्यात आली. मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या तरतुदींअन्वये लागवडयोग्य जमिनीचा तुकडा म्हणून स्वतंत्रपणे विल्हेवाट करणे अशक्य असलेल्या तुकड्याचे क्षेत्र असणार नाही.

**भाग तीन**

| बाधित परिमंडलामधून संपादित केलेले प्रकल्पबाधित व्यक्तीच्या जमिनीचे क्षेत्र (१) | प्रकल्पबाधित व्यक्तीला मंजूर करावयाचे लाभधारक परिमंडलामधील जमिनींचे क्षेत्र (२) |
|---|---|
| १. ८० आर पेक्षा अधिक नसलेले. | १. ४० आर पेक्षा कमी नसलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| २. ८० आर पेक्षा अधिक, परंतु २ हेक्टर्स पेक्षा अधिक नसलेले. | २. ८० आर पेक्षा मी नसलेले परंतु, १ हेक्टर आणि २० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| ३. २ हेक्टर्स पेक्षा अधिक परंतु, ३ हेक्टर्स व २० आर यांपेक्षा अधिक नसलेले. | ३. १ हेक्टर व २० आर पेक्षा कमी नसलेले परंतु, १ हेक्टर व ६० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| ४. ३ हेक्टर्स व २० आर पेक्षा अधिक. | ४. १ हेक्टर व ६० आरः |

परंतु, प्रकल्पबाधित व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल त्याबाबतीत २ हेक्टर्स व ८० आर क्षेत्राच्या कमालमर्यादेस अधीन राहून प्रत्येक तीन जादा व्यक्तींसाठी ४० आर इतकी जादा जमीन देता येईलः

परंतु, असे की, लाभधारक परिमंडलाव्यतिरिक्त इतर ठिकाणीची कोरडवाहू (जिराईत) जमीन देण्यात आली असेल त्याबाबतीत. ती १ हेक्टर ६० आर पेक्षा कमी असणार नाही:

परंतू, आणखी असे की, कोणत्याही बाबतीत, अशा प्रकारे जमीन देण्यात आल्यानंतर बाधीत व्यक्तीच्या धारण जमिनीची एकूण व्याप्ती, सरकारी जमिनीच्या विल्हेवाटीसंबंधातील संहितेअन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे तरतुद केलेल्या निर्वाहक धारण जमिनीच्या क्षेत्रापेक्षा अधिक असणार नाही:

परंतु, आणखी असे की, बाधित परिमंडलातील भूमिहीन शेतमजूर लाभधारक परिमंडलातील ४० आर जमिनीचा हक्कदार असेल.

**भाग चार**

| बाधित व्यक्तीचा प्रवर्ग (१) | गावठाणात देण्यात यावयाच्या भूखंडाचे क्षेत्र (२) |
|---|---|
| १. शेतकरी– | |
| (अ) त्याच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक नसेल तर | ३७० चौरस मिटर |
| (ब ) त्याच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल तर | एकूणात ७४० चौरस मीटर एवढ्या कमाल मर्यादेस अधिन राहून प्रत्येक जादा तीन व्यक्तींसाठी १८५ चौरस मीटर एवढे जादा क्षेत्र. |
| २. बिगर शेतकरी– | |
| (अ) त्याच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक नसेल तर | १८५ चौरस मीटर. |
| (ब) त्याच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल तर | एकुणात ३७० चौरस मीटर्सच्या कमाल मर्यादेस अधिन राहून प्रत्येक जादा तीन व्यक्तींसाठी ९२.५ चौरस मीटर एवढे जादा क्षेत्र. |

**स्पष्टीकरण :–** भाग ‘ तीन’ व भाग ‘ चार’ च्या प्रयोजनार्थ, “ कुटुंब ” म्हणजे बाधित व्यक्तीचा विवाहसाथी, मुलगे, अविवाहित मुली किंवा बहिणी , वडील व आई ; मात्र सर्व व्यक्ती तिच्याकडे राहणाऱ्या व तिच्यावर अवलंबून असल्या पाहिजेत.

शा.मु.औ.- (एच) २८-४,६५९ (प्रती)-११-२०१५

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालाक**

  **शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन**
  (प्रकाशन शाखा)
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**

  **शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार**
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : २६१२ ४७ ५९, २६१२ ५८ ०८
  २६१२ ८९ २०

- **व्यवस्थापक**

  **शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार**
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : २५ ६२ ६१५

- **सहायक संचालक,**

  **शासकीय ग्रंथागार**
  पैठणरोड, रेल्वेस्टेशन जवळ,
  औरंगाबाद ४३१ ००५.
  दूरध्वनी : २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  **शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री ग्रंथागार**
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : २६ ५० ३९५ व २६ ५० ४०२

## व महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते